**CNR No. MHSI01-000776-2014**

## निशाणी ५८ खालील आदेश

अपेलंट यांनी सदरचा अर्ज रिस्पॉडेंट नं. ५ यांचे विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्दबातल होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जावर रिस्पॉडंट यांनी म्हणणे दाखल करून विरोध केलेला आहे. अपेलंट व रिस्पॉडंट यांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. अपेलंटचे अर्जामध्ये कथन की, रिस्पॉडेंट नं. ५, मनोरमा यशवंत गावडे ह्या दिनांक ०३/०९/२०२३ रोजी मरण पावलेल्या आहेत. रिस्पॉडेंट नं. ५ यांचा मृत्यू दाखला उशिरा मिळाल्याने तसेच, मध्यंतरीच्या काळात अपेलंट हे आजारी असल्यामुळे रिस्पॉडेंट नं. ५ यांचे वारस वेळेत दाखल करु शकले नाहीत. त्यामुळे त्यांचेविरुध्द अबेटमेंटचा आदेश झालेला आहे. सदर कामी रिस्पॉडेंट नं. ५ यांचे वारस करण्यास झालेला अबेटमेंटचा आदेश न्यायपूर्ततेसाठी रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. रिस्पॉडंट यांनी अर्जावर म्हणणे दाखल करून विरोध करुन दिनांक ६.९.२०२३ रोजी प्रमाणपत्रावर आक्षेप नोंदवला आहे. हा अर्ज दाखल करण्यात हेतुपुरस्सर विलंब करण्यात आला आहे. ६ महिन्यांच्या विलंबाचे कारण वैध पुराव्यासह स्पष्ट करण्यात आलेले नाही. सबब, हा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा. जरी मंजूर केल्यास अगाऊ खर्चासह मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४. अपेलंट यांचा अर्ज, त्यावरील रिस्पॉडंट यांचे म्हणणे याचा विचार करता अपेलंट यांनी रिस्पॉडेंट नं. ५ यांचे वारस वेळेत अपिलमध्ये समाविष्ट केलेले नाहीत.

त्यामुळे अपेलंट नं. ५ विरूध्द अबेटमेंटचा आदेश झालेला आहे. रिस्पॉडेंट नं. ५ यांचे वारस अपिलाकामी आवश्यक पक्षकार असल्याने त्यांना संधी देणे योग्य व न्यायाचे असे होणारे आहे. सबब अर्जातील कथनांचा विचार करता दिलेले कारण योग्य आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

१. अपेलंट यांचा निशाणी ५८ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. रिस्पॉडेंट नं. ५ विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Digitally signed by SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Date: 2026.04.04 10:57:51 +0530

सिंधुदुर्ग–ओरोस
दिनांक– ०१/०४/२०२६

( श्री. एस. एस. इंदलकर )
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग–ओरोस.